**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक २५ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज शक्ती प्रदर्शन करत दक्षिण-पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघासाठी दाखल केला अर्ज.**
2. **विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची पहिली तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर.**
3. **महायुती उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या गोंदिया आणि अकोल्यासह राज्यात 11 ते 12 सभा प्रस्तावित.**
4. **नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची नियुक्ती; मुंबई उच्च न्यायालयातही पाच नवीन न्यायमूर्तींनी घेतली शपथ.**

---

**देवेंद्र फडणवीस उमेदवारी अर्ज**

**राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, परंपरागत दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून, शंखनाद प्रचार रथावर स्वार होत, आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजप प्रदेशाध्यक्ष, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह, महायुतीचे अनेक नेतेही, यावेळी उपस्थित होते. महायुतीच्या नागपूर शहरातील आतापर्यंत, घोषित झालेल्या सर्व उमेदवारांनी आज नामांकन अर्ज भरण्यासाठी, नागपूरच्या संविधान चौकातून, आकाशवाणी चौकात रॅली काढली. त्यानंतर या रॅलीचं सभेत रूपांतर झाले. नागपूरचा चेहरा-मोहरा भाजपच्या काळात आलेल्या प्रकल्पामुळ, बदलला असल्याचं, फडणवीस यांनी या सभेत सांगितलं.**

***नागपूर शहरात केलेला बदल हा लोकं डोळ्यानी पाहत आहे. बदलेला नागपूर, नागपूरचं इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूरमध्ये तयार झालेले वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षण संस्था, नागपूरची मेट्रो, नागपूरमध्ये आलेले उद्योग, प्रत्येक गोष्ट मी या ठिकाणी पाहतो आहे. आणि माझा दावा आहे, दहा वर्षाचं आमचं कामकाज साडेसातच वर्ष आम्हाला मिळाले आणि केंद्रातले दहा वर्ष आणि त्याच्या पूर्वीच १५ वर्षाचं काँग्रेस राष्ट्रवादीचं काम बघा, कोणालाही विचाराची आवशक्यता पडणार नाही, नागपूर शहर आम्ही बदलवून दाखवलं.***

**स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मागील ६० वर्षात, काँग्रेस जे करू शकली नाही ते, दहा वर्षात देवेंद्र फडणवीस यांनी, नागपूरत करून दाखवल्याचे गौरवोद्‌गार, यावेळी गडकरी यांनी काढले. दरम्यान, महायुतीला जनतेचा आशीर्वाद पुन्हा मिळणार असून, नागपूरमध्ये सुद्धा सर्व**

विधानसभेच्या जागा निवडून आणू असा विश्वास, फडणवीस यांनी, उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर, प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला. लाडक्या बहिणी आम्हाला भरभरून, आशीर्वाद देतील असं, देखील ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस हे यापूर्वी, दोन वेळा पश्चिम नागपूरमधून निवडून आले आहेत. त्यानंतर नव्यानं तयार झालेल्या, दक्षिण-पश्चिम नागपूर मतदार संघातून, तीन वेळा निवडून आलेत. १९९९ पासून सलग पाच वेळा, निवडून आलेले देवेंद्र फडणवीस, यांची ही सहावी विधानसभा निवडणूक आहे. दरम्यान, काँग्रेसतर्फे प्रफुल्ल गुडदे-पाटील यांना, दक्षिण-पश्चिम मतदारसंघातून, उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर वंचित बहुजन आघाडी तर्फे, विनय भांगे हे निवडणूक लढवतील.

---------------------------------

डॉ.देवराव होळी

गडचिरोली विधानसभा क्षेत्राचे विद्यमान आमदार, डॉ.देवराव होळी यांनी आज शक्तीप्रदर्शन करीत, आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. सुरुवातीला अभिनव लॉन इथं जाहीर सभा घेण्यात आली. सभेनंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत, रॅली काढण्यात आली. महायुतीनं अद्याप, गडचिरोली विधानसभा क्षेत्राच्या उमेदवाराच्या नावाची घोषणा केलेली नाही. मात्र, महायुती आपल्यालाच तिकिट देईल असा विश्वास, डॉ.देवराव होळी यांनी, माध्यमांशी बोलताना व्यकत केला.

---------------------------------

अर्ज दाखल

अकोल्यात आज, भाजपचे अकोला पूर्वचे उमेदवार, रणधीर सावरकर यांनी आपला नामांकन अर्ज दाखल केला. रणधीर सावरकर हे सलग दोन वेळा भाजपचे आमदार असून, तिसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत. तर वाशिम विधानसभा मतदारसंघांमध्ये, वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार, मेघा किरणराव डोंगरे यांनी आपला, उमेदवारी अर्ज तहसील कार्यालय वाशिम इथल्या निवडणूक विभागात दाखल केला. त्याचप्रमाणे यवतमाळच्या वणी विधानसभेसाठी, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार, राजु उंबरकर यांनी शक्तिप्रदर्शन करीत, उमेदवारी अर्ज दाखल केला.

---------------------------------

सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाचे, महायुतीचे अधिकृत उमेदवार तसंच, राज्याचे वनं, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री, सुधीर मुनगंटीवार येत्या २८ तारखेला सकाळी अकरा वाजता, मुल इथल्या उपविभागीय कार्यालयात, आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. यावेळी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी,

महायुती घटक पक्षातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. सुधीर मुनगंटीवार याआधीच्या सलग सहा विधानसभा निवडणुकांमध्ये, विजयी झाले आहेत.

-----------------------------------

काँग्रेस पक्ष -पहिली यादी

काँग्रेस पक्षानं ४८ उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. यामध्ये कराड पश्चिम मतदार संघातून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, साकोली-नाना पटोले, ब्रह्मपुरी-विजय वडेट्टीवार, तिवसा-यशोमती ठाकूर, संगमनेर -बाळासाहेब थोरात तर पलूस इथून विश्वजीत कदम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. लातूर शहर मतदारसंघातून अमित देशमुख यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

-----------------------------------

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष दुसरी यादी

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानं आज, पक्षाची दुसरी यादी जाहीर केली. अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष, सुनील तटकरे यांनी ही घोषणा केली. यात, अणुशक्तीनगर इथून, नवाब मलिक यांची मुलगी सना मलिक, इस्लामपूरमधून निशिकांत पाटील, तासगाव-कवठे महांकाळ मधून, संजय पाटील, वडगाव शेरी इथून, सुनील टिंगरे, शिरूर इथून ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवारी देण्य़ात आली आहे. दरम्यान, काँग्रेसचे आमदार झिशान सिद्दीकी आणि भाजपचे प्रताप पाटील चिखलीकर यांनी, आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर पक्षानं चिखलीकर यांना लोहा मतदारसंघातून तर सिद्दिकी यांना, वांद्रे पूर्व इथून, उमेदवारी जाहीर केली.

-----------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघासाठी, माजी महापौर, संदीप जोशी, भाजपचे नेते, नरेश बर्डे, माजी आमदार सुधाकर देशमुख यांच्या नावाची चर्चा असून, उत्तर नागपूरसाठी, संदीप जाधव, मिलिंद माने यांची नावं देखील, समोर आली आहेत. या सर्वांवर, भाजपच्या केंद्रीय संसदीय मंडळाद्वारे, निर्णय घेण्यात येईल अशी माहिती, भाजपचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज, नागपूरमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या गोंदिया आणि अकोल्यासह, राज्यात ११ ते १२ सभा प्रस्तावित असल्याची माहिती देखील, त्यांनी दिली. यावेळी यवतमाळच्या आर्णी विधानसभा मतदारसंघाचे, माजी आमदार, राजू तोडसाम यांनी, भाजपमध्ये पक्षप्रवेश केला आहे.

-----------------------------------

**नाना पटोले**

**महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक हरण्याच्या भीतीनं, भारतीय जनता पक्ष, सोशल मीडियाच्या माध्यमातून, अफवा पसरवत आहे. भारतीय जनता पक्ष हाच आरक्षण आणि संविधान विरोधी असून, लोकसभेचे विरोधी पक्षनेते, राहुल गांधी यांच्या एका विधानाची तोडफोड करून, फेक नरेटिव्ह पसरवण्याचा भाजपाचा प्रयत्न महाराष्ट्रात चालणार नाही असं, प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, नाना पटोले यांनी म्हटलं आहे. दिल्ली इथं माध्यम प्रतिनिधींशी बोलताना, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी, भाजपवर टीका केली आहे.**

-----------------------------------

**नवे सरन्यायाधीश**

**देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून, न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्‌यमान सरन्यायाधीश, न्यायमूर्ती डॉ.धनंजय चंद्रचूड यांचा कार्यकाळ येत्या दहा नोव्हेंबरला पूर्ण होत असून, न्यायमूर्ती खन्ना येत्या अकरा नोव्हेंबरपासून, सरन्यायाधीश पदाची सूत्रं स्वीकारतील. विद्‌यमान सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्याशी चर्चा करून, राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी हा निर्णय घेतल्याचं, केंद्रीय कायदे मंत्री, अर्जुनराम मेघवाल यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयातही अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून पाच नवीन न्यायाधीशांनी शपथ घेतली आहे. या नवीन नियुक्त्यांमुळ आता मुंबई उच्च न्यायालयात, न्यायमूर्तींची संख्या ६९ झाली आहे.**

-----------------------------------

**न्यायमूर्ती डी.वाय.चंद्रचूड-मुलाखत**

**गेल्या ७५ वर्षांत सर्वोच्च न्यायालयाचं रूप बदलून, ते जनतेचं न्यायालय झालं आहे असं प्रतिपादन, विद्‌यमान सरन्यायाधीश, न्यायमूर्ती डी.वाय.चंद्रचूड यांनी, सर्वोच्च न्यायालयाच्या, ७५व्या वर्धापन दिनानिमित्त आकाशवाणीला दिलेल्या विशेष मुलाखतीत केलं आहे. देशाचं सर्वोच्च न्यायालय लोकन्यायालय म्हणून काम करतं असं उदाहरण जगात क्वचित पाहायला मिळतं असं ते म्हणाले. ही विशेष मुलाखत आज रात्री, साडेनऊ वाजता, आकाशवाणीवरुन प्रसारित करण्यात येणार आहे.**

-----------------------------------

**एनएडीटी नागपूर**

**सामान्य नागरिकांच्या जीवनात, बदल घडवून आणणाऱ्या, करविषयक बाबींमध्ये, आयकर अधिकाऱ्यांनी आदेश तसंच नोटीस देताना, भाषेकडे लक्ष देण अत्यावश्यक असून, या भाषेमुळे संबंधित व्यक्तींच्या जीवनात, बदल घडून येतो असं प्रतिपादन, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती, विकास सिरपूरकर यांनी, आज नागपूरमध्ये**

केलं. आयकर अधिकारी पदावरून नव्यानं पदोन्नती मिळालेल्या सहाय्यक आयुक्तांच्या उत्तरायण २०२४ या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप आज त्यांच्या उपस्थितीत नागपूरच्या, राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकॅडमी अर्थात एन.ए.डी.टी. इथं, पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी, एन.ए.डी.टी.चे प्रशिक्षण महासंचालक, पी.सेल्वा गणेश उपस्थित होते. सप्टेंबर महिन्यापासून सुरु झालेल्या, या सात आठवड्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमात, १५० नव्यानं पदोन्नत झालेल्या, सहाय्यक आयकर आयुक्त अधिकारी प्रशिक्षणार्थींचा, समावेश होता.

-----------------------------------

कॅम्पस ॲम्बेसॅडर

वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात, मतदार जागृती कार्यक्रमांतर्गत, महाविद्यालयीन स्तरावर, मतदान जनजागृती करण्याकरीता, निवड केलेल्या कॅम्पस ॲम्बेसॅडरला, मार्गदर्शन शिबिराचं आज आयोजन, करण्यात आलं होतं. हे कॅम्पस ॲम्बेसॅडर आपापल्या भागात जाऊन नागरिकांना आणि मतदारांना लोकशाही तसंच मतदानाचं महत्व पटवून देणार आहेत. या शिबिराला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी मार्गदर्शन केलं.

-----------------------------------

हवामान

हवामान नागपूर, वर्धा आणि चंद्रपूर इथं, येत्या २७ ते २८ ऑक्टोबर दरम्यान, काही ठिकाणी मेघगर्जनेसह, हलक्या पावसाची शक्यता असून, पश्चिम विदर्भात, बुलढाणा वगळता सर्व जिल्ह्यात, अशाच स्वरूपाच्या हवामानाची शक्यता, नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं वर्तवली आहे.

-----------------------------------

आढावा विधानसभा मतदारसंघांचा

विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं, 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम, दररोज सायंकाळी सात वाजून दहा मिनिटांनी, अस्मिता वाहिनीसह, प्रादेशिक वृत्त विभागाच्या, Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात, आज मुंबई पूर्व उपनगरातल्या, मतदारसंघांचा आढावा, आपल्याला ऐकता येईल.

-----------------------------------